# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१६/०६/२०१६.

**१) लग्नाचे आमिष दाखवुन मुलीवर लैंगिक अत्याचार. :—**

सन २०१५ ते दिनांक २७/०४/२०१६ पर्यंत फिर्यादी पिडीत मुलगी व आरोपी हे एकमेकांचे मामे बहीन व आते भाऊ आहेत. आरोपीने फिर्यादीला लग्नाचे आमिष दाखवुन तीला १ वर्ष त्याच्या घरी ठेवले व त्या दरम्यान तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध प्रस्तापित केले व दि. १५/०६/२०१६ ला आरोपीने फिर्यादी सोबत लग्न करण्यास नकार दिला. असे फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७६(१) भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सपोनि. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) विवाहितेचा पैश्यासाठी शारीरीक व मानसिक छळ. :—**

दिनांक ११/०४/०१४ ते दि. ०३/०६/०१६ पर्यंत फिर्यादी विवाहित महिला ही आरोपी क्र. १ ची पत्नी आहे. फिर्यादीला तिचा पती व सासरची मंडळी आरोपी क्र. २ ते ७ यानी संगनमत करून माहेरून आंदन व ५०,०००/—रु. नगदी आणले नाही म्हणुन तिला मानसीक शारीरीक त्रास देवुन तिचा छळ केला. असे फिर्यादिचे तक्रार वरून पो.स्टे. नंदनवन नागपुर शहर येथे अप क्र. ००/१६ क. ४९८(अ),३४ भादंवि चे कागदपत्र पो.स्टे. जवाहरनगर येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४९८(अ),३४ भादंवि अन्वये नंबरी गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. पाटील पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) ईलेक्ट्रिक करंट लागल्याने म्हशीचा मृत्यु :—**

दिनांक १०/०६/०१६ रोजी १६.०० वा. दरम्यान फिर्यादी मानिकराव रतीराम पटले वय ६० वर्ष, रा. येरली हा त्याची म्हशीला चारा चारण्यास घेवुन गेला होता. म्हैस चरता चरता निघुन गेली व त्यानंतर ती म्हैस फिर्यादीला येरली शिवार येथील नाल्यावर मृत अवस्थेत दिसुन आली, यावरून फिर्यादीला वाटले की संशयीत आरोपी हा याच बांध्यावर ईलेक्ट्रीक करंट लावतो, म्हणुन फिर्यादीला वाटले की माझी म्हैस चरता चरता आरोपीच्या बांधीत गेली असावी व तीला करंट लागल्याने ती मरण पावली असावी. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२९ भादंवि सहकलम १३५ भा.वि.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. कळंबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) चोरी करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १५/०६/०१६ रोजी ००.३० वा. दरम्यान सर तर्फे फिर्यादी सफौ. बावणे पो.स्टे. साकोली हे मोटार सायकलने रात्रगस्त चेकिंग करीत होते तेव्हा प्रगती कॉलनी सेंदुरवाफा येथे तिन्ही आरोपी हे एका घराच्या मागच्या दाराजवळ सांदवाडीत चोरी करण्याचे उद्देशाने लपुन बसलेल्या

स्थितीत मिळुन आले. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १२२ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सफौ. बावणे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–**

दिनांक १५/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, तुमसर व सिहोरा येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १८ लिटर हातभट्टी दारू कि. ९००/–रू. तसेच जुगारातुन कि. १,५०,३३२/–रू. असा एकुण कि. १,५१,२३२/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.